# दत्तमहात्म्यातील कैवल्य लेणे



साहित्य सोनियाच्या खाणी...



**श्रीदत्तात्रेयस्तोत्र–संपूर्ण अर्थ आणि विवेचन**

**लेखक :** श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी

प्रकाशक : यज्ञेश्वर प्रकाशन

३/१०४, संगीता अपार्टमेंटस्

राजावाडी समोर, मुरबाड रोड, कल्याण(प.)–४२१३०१

**पृष्ठे :** १६० **मूल्य :** रु.१७५/–

**संपर्क :** अशोक सावंत–९८६९१५७३०८

मंगेश साखरे–९९२३१८०८२१

हिंदुधर्म आणि वर्णाश्रम धर्म यांच्या रक्षणासाठी दत्तसंप्रदाय प्रवर्तित झाला. भागवतात विष्णूचे चोवीस अवतार सांगितले असून दत्तात्रेय त्यातील सहावा अवतार आहे. दत्तात्रेय पूर्ण ब्रह्म असून कल्पन्ती तो अविनाशीच आहे. या संप्रदायाची उपासना कठोर, अवघड आहे. ती योगरूप असल्यामुळे मुख्यत: ब्रह्मचाऱ्यांसाठी आहे. तथापि दत्त संप्रदायात गृहस्थाश्रमाचे आचरण करणाऱ्या असंख्य प्रापंचिकांना 'गुरुचरित्र' पारायणासारखी उपासना सांगितली.

महाराष्ट्राचा विचार करीत असता श्रीगुरुचरित्रात उद्धृत केलेल्या श्रीपादश्रीवल्लभ आणि श्रीनृसिंह सरस्वती यांनी दत्तोपासना विशेष रूढ केली. परंतु मार्कण्डेय पुराण, ब्रह्मवैवर्तपुराण, श्रीमद्भागवत, इत्यादी प्राचीन संहिता, श्रीदत्तात्रेयोपनिषद, अवधूतगीता, गुरुगीता, त्रिपुरारहस्य, वगैरे संहितांमधील श्रीदत्तात्रेयांच्या अनेकविध लीलांसंबंधीचे विवेचन आणि तत्कालिन विभिन्न महान भक्तांच्या चरित्रांचे अवलोकन केले तर श्रीदत्तात्रेयांचे प्राचीन काळापासून ते आजतागायत वर्धिष्णु होणारे माहात्म्य लक्षवेधक ठरते. अशा या पारंपरिक उपास्य दैवताचा प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी) महाराजांनी उपलब्ध संदर्भाद्वारे श्रीदत्तपुराण, श्रीदत्तमाहात्म्य, आदि विख्यात ग्रंथ आणि अनेकविध स्तोत्ररचना व दत्तभक्ती, परमार्थाला अनुकूल असे वाङ्मय निर्माण करून उत्कट दत्तभक्तीचा परमआदर्श उभा केला.

भारतीय मोक्षविद्या व साक्षात्कारदर्शन यांचे स्वरूप बहुमिती असून या प्रज्ञानगंगेत नाना विचारप्रवाह, भूमिका आहेत. श्रीमद् शंकराचार्य यांनी अद्वैत वेदान्त दर्शनातून आत्मविद्या, ब्रह्मविद्या प्रभावीपणे स्पष्ट केली तर श्री टेंबेस्वामी महाराजांची गुरुपरंपरा शांकरवेदान्ताची असून तिचे अंतरंग आपल्या ग्रंथांतून स्पष्ट केले. स्वामीजींच्या विपुल ग्रंथसंपदेचे अवगाहन केले तर सिद्धांत आणि साधना, प्रमेय व प्रचिती या दृष्टीने श्रीस्वामी महाराज अर्वाचीन कालातील भारतीय मोक्षविद्येचे महान प्रणेते तर ठरतातच परंतु श्रीशंकराचार्यांनी जे कार्य केले त्याचाच प्रचार, प्रसार श्रीमद् वासुदेवानंदांनी केल्याचे प्रत्ययास येते. श्रीस्वामींनी संस्कृत आणि मराठीतून २० ग्रंथ, ४०० पेक्षा अधिक स्तोत्रे आणि पाच हजाराच्या जवळपास पद्य असे भरपूर लेखन केले आहे. श्रीगुरुगीतेत म्हटल्याप्रमाणे 'एवं विधं' गुरु ध्यात्वा, ज्ञानमुत्पद्यते स्वयं' अशी स्वयंभू ज्ञानशक्ती त्यांच्याठायी परिपूर्णपणे अस्तित्वात होती व तिच्या साहाय्याने अनेकांना त्यांनी सन्मार्गाला लावले तर त्रिविधतापांनी पोळलेल्या अनेक संत्रस्त जीवांचा उद्धार करून 'बुडते हे जन न देखवे डोळा। म्हणूनि कळवळा येत असे' ही संत स्वभावोक्ती सार्थ केली.

श्री स्वामी महाराजांची ग्रंथरचना हा त्यांचे समाधिन प्रज्ञान, ऋतंभरा प्रज्ञा यांचा आविष्कार आहे. प्राचीन ऋषी-मुनी आणि भारतीय संतांच्या साहित्यातील प्रतिभा, रसानभुभूती आणि परतत्त्वस्पर्श यांचे एकात्म दर्शन घडविणारी श्री स्वामींची वाङ्मयसंपदा उत्कट दत्तभक्तीच्या अंतर्यामी विलसणाऱ्या मंदाकिनीचा

मधाळ प्रवाह आहे. 'सर्वभूतहिते रत:' अशी धारणा असलेल्या जीवनमुक्ताची ही वाणी असून ते सिद्धावस्थेतील अमृतधारेप्रमाणे सामान्यांच्या उपकारासाठी प्रगट झाले आहेत. त्यांच्या वाङ्मयाला लाभलेला 'ईशस्पर्श' अलौकिक आहे. ज्ञानदेवांनी काव्याची मूळ शक्ती 'प्रज्ञा' असल्याचे सांगून मन, बुद्धी, मती, स्फूर्ती व उन्मेष या स्वाभाविक शक्तींचाही त्यांनी निर्देश केला आहे. त्याचप्रमाणे श्री वासुदेवानंदांच्या संपूर्ण साहित्याचे आलोडन करता माऊलींनी सांगितलेल्या प्रज्ञेचा प्रत्यय येतो.

अशा या उदात्त, कठोर आणि परिव्राजक परंपरेतून कार्यरत असणाऱ्या श्री. बापट गुरुजी यांनी आपल्या सद्गुरुंच्या 'श्रीदत्तात्रयस्तोत्र' या केवळ ९ श्लोकांचा मराठीतून केलेला अनुवाद तितकाच प्रज्ञावान, प्रतिभाशाली व प्रशस्त झाला आहे. शब्दांच्या अंतरंगात असलेल्या छटांना बरोबर हेरून त्याचा सद्गुरुंना अभिप्रेत असलेला अर्थान्वेष अतिशय समर्थपणे वाचकांसाठी सादर करणे ही तितकी सहजसाध्य गोष्ट नसून त्यासाठी गुरुकृपा व शारदेचा वरदहस्त असल्याशिवाय असे लेखन करणे अशक्य होय. परंतु स्वामीजींच्या (अ) घोरकष्टोधारण आणि श्रीगुरुस्तुति या दोन स्तोत्रांवर विवरणपर ग्रंथ श्री. बापटगुरुजींनी प्रकाशित केलेले ज्यांनी वाचले, पाहिले असतील त्यांना त्यांच्या लेखन व आकलन सामर्थ्याची पुरेशी कल्पना सहज आली असावी.

श्री. गुरुजींनी केलेले विवरण व विवेचन अत्यंत अभ्यासपूर्ण तर असतेच परंतु त्याचबरोबर त्यांचा व्यासंग व अधिकार याची अनुभूती प्रत्येक शब्दागणिक येऊन मन पुलकित होते, अज्ञात स्पंदनांचा अननुभूत असा परमानंद प्राप्त होतो. सद्गुरु टेंबेस्वामी यांनी या स्तोत्रामध्ये श्री दत्तात्रेयांना जी १९ आध्यात्मिक विशेषणे- महात्मानं, वरद, भक्तवत्सल, प्रपन्नार्तिहर, दीनबन्धु, कृपासिन्धु, सर्वकारणकारण, सर्वरक्षाकर, इत्यादींचा श्री. बापटगुरुजींनी प्रतिपादन केलेला अर्थ व विवेचन एखाद्या कसलेल्या चित्रकाराप्रमाणे शब्दांच्या कुंचल्याने प्रकरणांच्या पटावर तो चितारलेला आहे. आणि तो मनाच्या पिंजऱ्यात कायमचा स्थायी होतो. ह्या प्रज्ञेचा, प्रतिभेचा विलास असामान्य आहे. अध्यात्माला, उपासनेला गुरुकृपांकित असे छत्र लाभले म्हणजे शब्द, स्पर्श आणि दृष्टी यातून किती परिणामकारक अशी संवेदना साधते त्याचे प्रत्यंतर सदरहू ग्रंथ वाचल्यानंतर येते.

अनुवादाच्या वा विवेचनाच्या निमित्ताने प्रस्फुटित केलेले विचार प्रवाही तर आहेतच परंतु त्या शब्दांनादेखील दिव्यत्वाचे तेज लाभलेले दिसते. त्यामुळे अनावश्यक अथवा अस्थानी असे लेखन कुठेच जाणवत नाही. 'या हृदयीचे त्या हृदयाला' इतके ते सटीक व समर्पक झाले आहे. अत्यंत हळुवारपणे, मायेच्या स्पर्शातून एकेक शब्द लिहिलेला असल्यामुळे काठिण्याचा प्रत्यय तर सोडाच परंतु एका उपासनापूर्तीचा गहिरा आनंद संपूर्ण पुस्तकाच्या वाचनानंतर होतो. 'ज्ञानोत्तर भक्ती' (पृ.५२) संबंधीचे विवेचन अत्यंत मार्मिक आहे तर 'शरणागती' (पृ.७०) मनाचा ठाव घेते. पापाची व्याख्या (पृ.९०) मनाची कवाडे उघडते तर धर्म म्हणजे काय (पृ.११८) बरेच समाधान करून देते. सर्वांत शेवटी (पृ.१४२) स्तोत्र पठणाचे वैज्ञानिक महत्त्व आधुनिक काळातील तरुण व नास्तिक मंडळींना सकारात्मक दिशा देणारे आहे.

असे सर्वांग परिपूर्ण व सोप्या, सुटसुटीत, सुबोध आणि सुगम शैलीतील 'श्रीदत्तात्रेयस्तोत्र' बहुतजनांच्या शांती, तुष्टी, पुष्टी शमनार्थ निश्चितच उपयुक्त ठरणारे असे संग्राह्य पुस्तक अतिशय स्वागतार्ह ठरेल असा विश्वास आहे.

◆◆◆